चाणक्य मंडल परिवार




# MPSC

# प्रचलित घडामोडी

## *स्पेशल कोर्स (मराठी)*

Headlines: १३ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर २०१९

२० नोव्हेंबर २०१९

# हेडलाईन्स

## महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू

- विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून 25 दिवस उलटून गेल्यानंतरही कोणताही पक्ष सत्ता स्थापन करण्यास असमर्थ ठरल्याने अखेर महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे.
- विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. भाजप-शिवसेना युतीला 161 जागांसह बहुमत मिळाले. पण मुख्यमंत्रीपदावर दोघांमध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यामुळे त्यांनी एकत्रितपणे सरकार स्थापण्याचा दावा केला नाही.
- राज्यपाल भगतसिंह कोश्यारी सर्वात मोठा पक्ष म्हणून प्रथम भाजपला नंतर शिवसेनेला व शेवटी राष्ट्रवादीला सरकार स्थापण्याचा दावा करण्यासाठी निमंत्रित केले पण तिन्ही पक्ष त्याबाबत अपयशी ठरल्याने राष्ट्रपती राजवटीशिवाय पर्याय उरला नाही.
- त्यामुळे कोश्यारी यांनी 12 नोव्हेंबर रोजी राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे केली व त्यावर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी स्वाक्षरी केली.
- त्यामुळे पुढचा काही काळ राज्याचा कारभार शासनव्यवस्था मुख्यमंत्री नाही तर राज्यपालांच्या मार्फत चालवली जाईल.

**महाराष्ट्रात यापूर्वी तीनदा राष्ट्रपती राजवट**

- बहुमत मिळूनही राष्ट्रपती राजवट लागू करण्याची देशातील ही पहिलीच वेळ आहे.
- देशामध्ये आजपर्यंत एकूण 131 वेळा राष्ट्रपती राजवट लागू झाली आहे. राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू होण्याची ही तिसरी वेळ आहे.

**1980 मध्ये 113 दिवस :**

- शरद पवारांच्या नेतृत्वाखालील पुलोद सरकार बरखास्त झाल्यानंतर 17 फेब्रुवारी ते 9 जून 1980 या कालावधीत प्रथमच राष्ट्रपती राजवट लागू झाली होती.

**2014 मध्ये 33 दिवस :**

- राष्ट्रवादीने पृथ्वीराज चव्हाण सरकारचा पाठिंबा काढल्याने सरकार कोसळले होते आणि राज्यात 28 सप्टेंबर 2014 ते 31 ऑक्टोबर असे 33 दिवस राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.

**राष्ट्रपती राजवट :**

- भारतीय राज्यघटनेच्या कलम 356 मध्ये राज्यातील आणीबाणी संदर्भात तरतुदी आहेत.
- त्यानुसार राज्यात कोणताही पक्ष किंवा पक्षांचा गट सरकार स्थापन करू शकत नसेल अथवा राज्यातील संवैधानिक यंत्रणा अयशस्वी झाल्यास संबंधित राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाते.
- राष्ट्रपती राजवटीत राज्याची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींकडे जाते. विधानसभेचे कार्य संसदेकडे जाते.
- न्यायव्यवस्थेवर याचा कोणताही परिणाम होत नाही.
- राष्ट्रपती राजवट एकावेळी 6 महिन्यांसाठी लागू केली जाते. नंतर लोकसभा आणि राज्यसभेच्या संमतीने राष्ट्रपती राजवटीचा कालावधी जास्तीतजास्त 3 वर्षांपर्यंत वाढवता येतो.

## 1 डिसेंबर पासून देशभरात वाहनांसाठी फास्टॅग

- देशभरातील वाहनांसाठी येत्या 1 डिसेंबर 2019 पासून देशभरातील टोल नाक्यांवर टोलचे पैसे फास्टॅगच्या माध्यमातून वसूल केले जाणार आहेत.
- यामुळे टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची चिन्हे आहेत.

**फास्टॅग म्हणजे काय ?**

- ही एक इलेक्ट्रॉनिक पद्धत आहे. फास्टॅग वाहनांच्या दर्शनी भागास लावले जाणार आहे.
- गाडीवर फास्टॅग असल्यास देशभरातील टोल नाक्यांवर कुठल्याही प्रकारचे रोख पैसे न भरता वाहन पुढे नेता येईल.
- वाहन टोलनाक्याजवळ पोहोचल्यानंतर तेथील सेल्स कारच्या काचेवर लावलेला फास्टॅग स्टिकर ओळखतो व संबंधित चालक/मालकाच्या खात्यातून टोलची रक्कम कापली जाते.
- यासाठी केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या मध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहे.
- या प्रणालीचे 'वन नेशन वन फास्टॅग' असे नामकरण करण्यात आले आहे.

## सरन्यायाधीश माहिती अधिकारात

- सरन्यायाधीशांचे कार्यालय सार्वजनिक आस्थापना असल्याने ते माहिती अधिकार कायदा (RTI) च्या कक्षेत येते असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.
- मात्र जनहितासाठी माहिती जाहीर करताना न्यायिक स्वातंत्र्य लक्षात घेतले पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.
- या निकालामुळे न्यायिक स्वातंत्र्य आणि पारदर्शकता यांचा समतोल साधला गेला आहे.
- सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठाने याबाबतचा 2010 मधील निकाल वैध ठरवत तीन याचिका फेटाळून लावल्या.
- दिल्ली उच्च न्यायालयाच्या 2010 च्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयाचे महासचिव तसेच केंद्रीय सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांनी आव्हान याचिका दाखल केल्या होत्या.
- न्यायवृंदाने नेमणुकीसाठी कोणत्या न्यायाधीशांच्या नावाची शिफारस केली हे या कायद्यानुसार जाहीर करता येईल. मात्र त्यामागील कारणे जाहीर करता येणार नाहीत असे न्यायालयाने जाहीर केले.
- सरन्यायाधीशांचे कार्यालय RTI च्या कक्षेत येते, न्यायिक स्वातंत्र्य हा विशेषाधिकार नसून ती जबाबदारी आहे असे दिल्ली उच्च न्यायालयाने जानेवारी 2010 च्या निकालात म्हटले आहे.

**माहिती अधिकारांतर्गत कोण?**

- कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका (सरन्यायाधीशांसह) ही तिन्ही घटनात्मक आस्थापने
- संसद किंवा राज्य विधिमंडळाने कायदा करून स्थापन केलेली कोणतीही संस्था.
- केंद्र व राज्य सरकारी आर्थिक मदतीवर आणि नियंत्रणावर चालणाऱ्या संस्था.
- खासगीकरण झालेल्या सार्वजनिक प्राधिकरणे, वीज कंपन्या

**माहिती अधिकारांतर्गत कोण नाही?**

- खासगी संस्था वा संघटना
- राजकीय पक्ष
- माहिती अधिकार कायद्यातील अपवाद

**माहिती अधिकार कायदा RTI 2005**

- 12 ऑक्टोबर 2005 रोजी अंमलात आला.
- हा कायदा सर्वप्रथम स्वीडनमध्ये 1766 ला लागू झाला.
- माहितीचा अर्थ हा कोणत्याही स्वरूपातील साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सूचना, परिपत्रके, आदेश, अहवाल, नमुने, कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील सामग्री इ. चा समावेश होतो.

## मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी न्या. मुहम्मद रफिक

- न्या. मुहम्मद रफीक यांची मेघालय उच्च न्यायालयाचे 8 वे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- त्यांनी न्या. अजयकुमार मित्तल यांची जागा घेतली आहे.
- मेघालयाचे राज्यपाल तथागत रॉय यांनी त्यांना शपथ दिली.
- सुरुवातीला त्यांनी राजस्थान उच्च न्यायालयात काम केले.
- 1999 ते 2006 या काळात त्यांनी वकील म्हणून काम पाहिले.
- यापूर्वी त्यांनी दोनदा राजस्थानचे कार्यवाहक मुख्य न्यायाधीश म्हणूनही काम पाहिले.
- मेघालयाचे उच्च न्यायालय राजधानी शिलॉग येथे आहे.
- स्थापना : 23 मार्च 2013.

## पटना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी न्या. संजय करोल

- न्या. संजय करोल यांची पटना उच्च न्यायालयाचे 43 वे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- बिहारचे राज्यपाल फागु चौहान यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.
- न्या. संजय करोल यांनी न्या. अमरेश्वर प्रताप साही यांची जागा घेतली.
- 2007 रोजी त्यांची पटना उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

- त्यांनी 5 वर्षे हिमाचल प्रदेशात महाधिवक्ता म्हणूनही काम पाहिले. 2018 रोजी त्यांची त्रिपुरा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती.

## 11 वी ब्रिक्स परिषद

- 13 ते 14 नोव्हेंबर रोजी ब्राझिलिया ब्राझील येथे ब्रिक्स परिषद पार पडली.
- यामध्ये सर्व सदस्य देशांचे प्रमुख उपस्थित होते.
- पंतप्रधान मोदींनी सदस्य देशांतील उद्योजकांना भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.
- तसेच सदस्य देशांनी अमेरिकी डॉलरवरचे अवलंबित्व कमी व्हावे यासाठी ब्रिक्स देशांनी स्वत:चे आभासी चलन आणावे असेही ठरवण्यात आले.

**BRICS**

- स्थापना : 2006
- सुरुवातीला ब्राझील, रशिया, भार व चीन सदस्य होते (BRIC)
- 2010 मध्ये दक्षिण आफ्रिका सदस्य झाल्यापासून संघटनेचे नाव BRICS
- ही एक आर्थिक, राजकीय सहकार्य करणारी प्रादेशिक संघटना आहे.

## अल्टिमा थ्युलचे नासाकडून 'अरोकोथ' असे नामकरण

- अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने 'अल्टिमा त्थुल' नामक ट्रांसचे नेपच्युनियम ऑब्जेक्टचे नामांतर 'अरोकोथ' असे केले आहे.
- अल्टिमा थ्युल पृथ्वीपासून सुमारे 6.4 अब्ज कि.मी. अंतरावर आहे.
- ते सूर्यमालेच्या कुटूपर बेल्टमध्ये स्थित आहे. कुटूर बेल्ट हा पट्टा गोठलेल्या द्रव्यांनी बनला आहे. हा पट्टा नेपच्यून ग्रहापासून 2 अब्ज कि.मी. अंतरावर तर प्लुटोपासून 1.5 अब्ज कि.मी. अंतरावर आहे.
- नासाच्या न्यू होरायझन यानाने अल्टिमा थ्युलची असंख्य छायाचित्रे घेतली.

## नवजात कृष्णविवरातील गुरुत्वीय लहरी शोधण्यात यश

- नवजात कृष्णविवरातील गुरुत्वीय लहरी शोधण्यात संशोधकांना प्रथमच यश आले असून त्यातील चक्राकार प्रारूपामुळे कृष्णविवराचे वस्तुमान, त्याची फिरण्याची दिशा, पद्धत यावर माहिती मिळाली आहे.
- 'फिजिकल रिव्ह्यू लेटर्स' या नियतकालिकानुसार कृष्णविवराचे वस्तुमान, फिरण्याची पद्धती व गती, विद्युतभार हे प्रमुख निरीक्षणक्षम घटक असतात.
- आईनस्टाईन यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतात म्हटल्यानुसार ठराविक वस्तुमान व गती असलेल्या कृष्णविवराचा क्षय हा विशिष्ट पद्धतीने होत असतो. मॅसॅच्युसेट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या अमेरिकी संस्थेतील वैज्ञानिकांनी हे संशोधन केले असून त्यांनी या कृष्णविवराची चक्राकार गती, वस्तुमान याबाबत अंदाज मांडला होता.

## मॅच फिक्सिंगला गुन्हा घोषित करणारा श्रीलंका हा दक्षिण आशियातील पहिला देश

- मॅच फिक्सिंगच्या वाढत्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी श्रीलंका सरकारने क्रीडा क्षेत्राशी संबंधित अपराध प्रतिबंध कायदा केला आहे.
- हे विधेयक तयार करण्यासाठी श्रीलंकन क्रीडा मंत्रालयाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागासोबत मिळून काम केले आहे.
- या नवीन कायद्यानुसार एखादा खेळाडू खेळात भ्रष्टाचार करत असल्याचे आढळल्यास त्याला 10 वर्षांपर्यंतची शिक्षा आणि दंड होऊ शकतो.
- आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग श्रीलंका क्रिकेटची 2017 पासून चौकशी करीत आहे.
- श्रीलंकेचा क्रिकेटपटू सनथ जयसूर्या आयसीसीच्या नियमांतर्गत दोषी ठरला होता व त्याच्यावर 2 वर्षांसाठी बंदी घालण्यात आली होती.

## मॉरिशसच्या पंतप्रधानपदी पुन्हा प्रविंद जुगनाथ

- प्रविंद जुगनाथ यांची मॉरिशसच्या पंतप्रधान पदावर पुन्हा एकदा निवड झाली आहे.
- त्यांचा कार्यकाळ 5 वर्षांचा असेल. त्यांच्या मंत्रिमंडळात 23 मंत्री असतील.
- मॉरिशसमध्ये झालेल्या निवडणुकीत जुगनाथ यांच्या मॉरेशियन अलायन्स पक्षाने संसदेच्या 70 पैकी 42 जागा जिंकल्या तर नवीन रामगुलामच्या नॅशनल अलायन्सला 17 जागा व पॉल बेरेंगेर यांच्या मॉरिशियन मिलिटंट मुव्हमेंटला 9 जागा मिळाल्या होत्या.
- मॉरिशस हे बेट हिंदी महासागरातील आफ्रिका खंडाजवळ असलेला देश आहे.
- मॉरिशसची राजधानी पोर्ट लुईस येथे आहे.

## लाचलुचपत जोखीम मॅट्रिक्स 2019 (Trace Bribery Risk Matrix 2019)

- जगातील लाचलुचपत प्रतिबंधक मानक ठरविणारी आंतरराष्ट्रीय संस्था ट्रेस (TRACE) लाललुचपत जोखीम मॅट्रिक्स प्रकाशित करते.
- ट्रेस मॅट्रिक्स हे एक जागतिक व्यवसाय लाच जोखीमचे मूल्यांकन करण्याचे साधन आहे. जे 200 देशांमधील व्यवसाय, लाचखोरीचे जोखमीचे मूल्यांकन करते.
- ट्रेस प्रत्येक देशाला 1 ते 100 गुण देते आणि जर एखाद्या देशाला उच्च गुण मिळाले तर याचा अर्थ असा आहे की त्या देशात व्यवसायात लाच घेण्याचा उच्च धोका आहे.

**सर्वात कमी लाचखोरीचा धोका :**

- न्यूझीलंड,
- नॉर्वे
- डेन्मार्क,
- स्वीडन
- फिनलँड

**सर्वात जास्त लाचखोरीचा धोका**

- सोमालिया,
- साऊथ सुडान
- नॉर्थ कोरिया,
- येमेन
- व्हेनेझुएला,
- ब्रिक्स राष्ट्रांमध्ये दक्षिण आफ्रिका या देशात सर्वात कमी व्यवसायात लाचखोरीचा धोका आहे म्हणजे दक्षिण आफ्रिका हा देश ब्रिक्स राष्ट्रांमध्ये सर्वात वरच्या क्रमांकावर आहे.
- दक्षिण आशियामध्ये, बांग्लादेश या देशात सर्वात जास्त व्यवसायात लाचखोरीचा धोका आहे.
- एकूण जोखमीचे 48 गुणांसह भारत 78 व्या स्थानावर आहे.

## भारताच्या रवि प्रकाश यांना 'ब्रिक्स यंग इनोव्हेटर पुरस्कार'

- चौथ्या ब्रिक्स यंग सायंटिस्ट फोरमच्या कॉन्क्लेवमध्ये भारताच्या रवि प्रकाशने ब्रिक्स यंग इनोव्हेटर पुरस्कार जिंकला आहे.
- लहान आणि सीमांत ग्रामीण दुग्ध उत्पादकांसाठी परवडणारी स्वदेशी दूध शीतकरण युनिट शोधल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.
- हे युनिट नॅनो फ्लुईड आधारित फेंज चेंज मटेरियलचा वापर करून अर्ध्या तासाच्या आत कच्च्या दुधाचे तापमान 37° से. पासून 7° से. पर्यंत खाली आणते. यामुळे दुग्ध उत्पादनानंतर दुधाची गुणवत्ता आणि सुरक्षितता राखली जाते.
- रवि प्रकाश यांनी बेंगलोर येथील आयसीएसआर राष्ट्रीय संशोधन संस्थेमधून पीएच. डी. पूर्ण केली आहे.

**ब्रिक्स यंग इनोव्हेटर पुरस्कार**

- ब्राझीलमधील फोर्टलेझा येथे जुलै 2014 रोजी 6 व्या ब्रिक्स परिषदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रिक्स-यंग सायंटिस्ट फोरम तयार करण्याची कल्पना मांडली होती. अखेरीस त्यांच्या या प्रस्तावाला मार्च 2015 रोजी सर्वानुमते पाठिंबा मिळाला.
- ब्राझीलमध्ये 6-8 नोव्हेंबर दरम्यान चौथ्या ब्रिक्स-यंग सायंटिस्ट फोरम कॉन्क्लेव समारंभ आयोजित केला होता.

## डॉ. कारंथ यांना जॉर्ज स्कॉलर जीवनगौरव पुरस्कार

- भारताचे जीवशास्त्रज्ञ डॉ. के. उल्हास कारंथ यांना जॉर्ज स्कॉलर जीवनगौरव पुरस्कार वन्यजीव संवर्धन सोसायटीच्या वतीने देण्यात आला.
- हा पुरस्कार त्यांना व्याघ्र संवर्धनाच्या क्षेत्रात कार्य

केल्यामुळे देण्यात आला आहे.

- हा पुरस्कार प्राप्त करणारे ते पहिलेच भारतीय आहेत.
- डॉ. कारंथ भारतात सेंटर फॉर वाइल्ड लाईफ स्टडीजचे संचालक आहेत.
- यापूर्वी भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे.

**वन्यजीव संवर्धन सोसायटी :**

- ही एक वन्यजीवन क्षेत्रात काम करणारी जागतिक संघटना आहे.
- वन्यजीव संघटना सोसायटी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आहे.
- ही संस्था 60 देशांमध्ये आणि जगातल्या सर्व महासागरांमध्ये विविध प्रकल्प चालवते.
- डॉ. जॉर्ज स्कॉलर हे जगातील सर्वात मोठे वन्यजीव शास्त्रज्ञ संरक्षणवादी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या स्मरणार्थ हा जॉर्ज स्कॉलर जीवनगौरव पुरस्कार देण्यात येतो.

## कुंग फू नन्स यांना 'गेम चेंजर' पुरस्कार

- कुंग फू नन्स यांना अलीकडेच न्यूयॉर्कमध्ये एशियाटिक सोसायटीचा प्रतिष्ठित 'गेम चेंजर पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले आहे.
- हिमालयीन प्रदेशातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी व महिला आधारित भेदभाव दूर करण्याच्या त्यांच्या अनुकलनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.
- त्यांची टॅगलाईन 'स्वत:च स्वत:चे हिरो बना' अशी आहे.
- या नन्स आपले प्रथम नाव म्हणून जिग्मेचा वापर करतात आणि जिग्मेचा अर्थ निर्भय असा होतो.

**कुंग फू नन्स**

- कुंग फू नन्स हा 1000 वर्ष जुन्या द्रुकपा वारशाच्या सुमारे 700 नन्सचा मजबूत समुदाय आहे.
- त्या बौद्धिक पिढीचे प्रतिनिधित्व करतात.
- सबलीकरण आणि समानता यांना प्रोत्साहन देणे आणि समुदायांना सुधारण्यासाठी ते प्राचीन मार्शल आर्टचा वापर करतात.
- त्या युक्तींना रूढी परंपरांच्या जोखंडातून बाहेर काढून त्यांना स्वत:चे नायक होण्यासाठी प्रवृत्त करत आहेत.

**एशियाटिक सोसायटी गेम चेंजर पुरस्कार**

- स्थापना : 1956
- ही एक शैक्षणिक संस्था आहे.
- गेम चेंजर पुरस्कार प्रतिवर्षी अशा व्यक्ती किंवा संस्थांना दिला जातो ज्यांनी एशियाटिक सोसायटीच्या मते अनेक क्षेत्रांमध्ये प्रेरणादायक, ज्ञानवर्धक आणि उच्च नेतृत्व दर्शविले आहे.

## दूती चंदला 'टाईम नेक्स्ट 100' मध्ये स्थान

- वेगवान धावपटू दूतीचंद हिला जगातील सर्वाधिक प्रभावी व्यक्तींचा 'टाईम नेक्स्ट 100' यादीत स्थान मिळाले आहे. ओदिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी तिचे अभिनंदन केले आहे.
- आशियाई क्रीडा स्पर्धेच्या 100 व 200 मी. प्रकारात तिने रौप्य पदक जिंकले होते.
- नेपोली येथे विद्यापीठ स्पर्धेत सुवर्ण जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली होती.

**दूतीचंद** – भारतीय महिला धावपटू

**जन्म** – 3 फेब्रुवारी 1996

**प्रतिस्पर्धा** – स्प्रिंट

**व्यक्तिगत सर्वश्रेष्ठ कामगिरी –**

1) 100 मीटर =11.34 सेकंद (अल्माटी 2016)

2) 200 मीटर = 22.73 सेकंद (अल्माटी 2016)

3) 4 x 100 मीटर रिले = 43.42 सेकंद (अल्माटी 2016)

## आशियायी नेमबाजी स्पर्धेत सौरभचा रौप्यवेध

- विश्वचषक आणि क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता 17 वर्षीय सौरभने 244.5 गुण मिळवत आशियायी नेमबाजी स्पर्धेत दुसरे स्थान मिळवले.
- उत्तर कोरियाच्या किम संग गुकने 246.5 गुण मिळवत विश्वविक्रमासह सुवर्णपदक पटकाविले.
- इराणच्या फॉरॅघी जावेदने (221.8 गुण) कांस्यपदक प्राप्त केले.
- लुसेल नेमबाजी संकुलात चालू असलेल्या या स्पर्धेत सौरभ आणि अभिषेक वर्मा प्रत्येकी 583 गुणांसह अनुक्रमे सातव्या आणि सहाव्या स्थानावर अंतिम फेरीसाठी पात्र ठरले. आठ जणांचा समावेश असलेल्या अंतिम फेरीत अभिषेकने 181.5 गुण मिळवल्याने

पाचव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

## पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत शरदला रौप्य आणि मरियप्पनला कांस्यपदक

- शरदकुमार आणि मरियप्पन यांगाव्हेल यांनी जागतिक पॅराॲथलेटिक्स अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेतील उंच उडी प्रकारात अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक कमवत टोक्यो पॅरालिम्पिक क्रीडास्पर्धेसाठी पात्रतेची दोन स्थाने निश्चित केली आहे.
- दोन वेळा आशियाई पॅराक्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या शरदने 1.83 मीटर उंच उडी घेतली. सॅम ग्रीवीने1.86 मीटर विक्रमासह सुवर्णपदकावर नाव कोरले. शरदने सुरुवातीला आघाडी घेतली होती परंतु सॅमने त्याला मागे टाकले.
- ही स्पर्धा दुबई येथे पार पडली. या स्पर्धेत 118 राष्ट्रांमधील 1403 खेळाडूंनी भाग घेतला होता.
- ही स्पर्धा दरवर्षी घेतली जाते. मागील वर्षी म्हणजेच 2018 मध्ये जर्मनी येथे पार पडली.

**पॅरा ॲथलेटिक्स म्हणजे काय?**

- सर्वात पहिल्यांदा दुसऱ्या महायुद्धातील दिग्गजांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्टोक मँडेविले गेम्समध्ये 1952 मध्ये व्हीलचेअर शर्यतीचा पहिला पॅरा ॲथलेट स्पर्धक दिसला होता.
- 1960 पासून ॲथलेटिक्स पॅराऑलिम्पिक स्पर्धेचा भाग आहे. ह्यात दृष्टीदोष, सेरेब्रल पाल्सी, अँप्युट्स असलेल्या अपंग ॲथलेटिक्सचा समावेश असतो.
- हा खेळ ट्रॅकवर किंवा मैदानावर खेळवला जातो. त्यात धावणे, फेकणे, उडी मारणे यासारख्या खेळाचा समावेश असतो.

## भारताला हॉकी विश्वचषकाचे यजमानपद

- 2023 मध्ये होणाऱ्या पुरुष हॉकी विश्वचषकाचे यजमानपद भारताला मिळाले आहे.
- या विश्वचषकाचा कालावधी 13 जानेवारी ते 20 जानेवारी 2023 दरम्यान असणार आहे.
- भारत चौथ्यांदा यजमानपद भूषवणारा पहिला देश बनला आहे.

**भारतातील मागील विश्वचषक :**

- 1982 : मुंबई
- 2010 : नवी दिल्ली
- 2018 : भुवनेश्वर

## मेरी कॉमला 'ऑली' उपाधी

- भारताची स्टार बॉक्सर मेरी कॉमला जागतिक ऑलिम्पिक असोसिएशनने 'ऑली' च्या उपाधीने गौरविले आहे.
- ऑलिंपिक पदक जिंकण्यासोबतच समाजात ऑलिंपिक मूल्यांना वाव देण्याकरता हा सन्मान दिला जातो.
- मेरी कोमने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत एकूण आठ पदके मिळवली आहेत.
- सहा सुवर्ण, एक रौप्य व एक कांस्य पदकाची कमाई केली आहे. इतके पदक जिंकणारी ती एकमेव बॉक्सर आहे.

## माजी मुख्य निवडणूक आयुक्त : टी. एन. शेषन यांचे निधन

- निवडणूक आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीतून भारतीय निवडणूक प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडवणारे माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचे वयाच्या 86 व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.
- निवडणूक आयोग ही लोकशाहीतील महत्त्वाची स्वायत्त संस्था असून ती राजकीय हस्तक्षेपापलिकडे असते याची जाणीव शेषन यांच्या कार्यपद्धतीमुळेच नागरिकांना प्रथमच प्रकर्षाने झाली. टी. एन. शेषन यांच्या बद्दल –
- पूर्ण नाव : तिरूनेलै नारायण अय्यर शेषन
- जन्म : 15 डिसेंबर 1932 केरळमधील पलक्कड येथे
- चैन्नईत पदवीपर्यंतचे शिक्षण, काही काळ त्यांनी प्राध्यापक म्हणूनही नोकरी केली.
- ते 1955 च्या तामिळनाडू केडरचे आयएएस अधिकारी होते.

**मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यकाळ :**

- 12 डिसेंबर 1990 ते 11 डिसेंबर 1996
- देशाचे 10 वे निवडणूक आयुक्त
- या कार्यकाळात त्यांनी अनेक नियम करून राजकारण्यांना जबर बसवली.
- त्यांनीच मतदान ओळखपत्र सुरू करून बोगस मतदानावर नियंत्रणही आणले.

- राजकारणी एक तर ईश्वराला आणि दुसरे शेषन यांना घाबरत असल्याचे त्या काळात म्हटले जात होते, एवढा त्यांचा दरारा होता.
- मुख्य निवडणूक आयुक्तासोबत इतर दोन निवडणूक आयुक्त ही आयोगाची रचना त्यांच्याच काळात अंमलात आली.
- निवडणूक प्रणालीत पारदर्शकता आणण्याचं आणि निवडणूक प्रक्रिया बदलण्याचं सर्व श्रेय त्यांनाच जातं.
- तीन-चार टप्प्यांत निवडणुका घेणे, ही देखील त्यांचीच कल्पना होती.
- मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून निवृत्त झाल्यावर 1997 मध्ये त्यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवली होती, पण माजी राष्ट्रपती के. आर. नारायणन् यांनी त्यांचा पराभव केला.
- निवृत्त झाल्यावर त्यांनी देशभक्त ट्रस्टची स्थापना केली.
- 1999 मध्ये त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांच्याविरोधात लोकसभेची निवडणूक लढवली होती पण त्यातही त्यांना यश आले नाही.
- 1996 मध्ये त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने गौरविण्यात आले.
- 'शेषन - ऑन इंटिमेट स्टोरी' हे गोविंदन कुट्टी यांनी त्यांच्यावर लिहिलेले पुस्तक आहे.

**भारतीय निवडणूक आयोग**

- राज्यघटनेच्या कलम 324 नुसार रोजी स्थापना

**स्थापना :**

- 25 जानेवारी 1950 म्हणून 25 जानेवारी (राष्ट्रीय मतदार दिवस)
- रचना : मुख्य निवडणूक आयुक्त + (राष्ट्रपती निश्चित करतील तेवढे अन्य निवडणूक आयुक्त)

**नेमणूक :**

- राष्ट्रपतीद्वारे

**कोणत्या निवडणुका घेते ?:**

- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद

**पात्रता :**

- राज्यघटनेमध्ये नमूद नाही.
- मुख्य व इतर निवडणूक आयुक्त यांना समान अधिकार आहेत. त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाइतका दर्जा आहे.
- त्यांचा कार्यकाल 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर पूर्ण होईल तोपर्यंत असतो.
- मुख्य निवडणूक आयुक्ताला कार्यकालाची हमी दिली आहे. ज्या पद्धतीने व कारणासाठी न्यायालयाच्या न्यायाधीशाला पदच्युत केले जाते फक्त त्याच पद्धतीने व कारणांसाठी त्याला पदच्युत केले जाते.
- 1950 म्हणजे स्थापनेपासून 15 ऑक्टोबर 1989 पर्यंत भारतीय निवडणूक आयोग एक सदस्यीय आयोग होता.
- 61 वी घटनादुरुस्ती, 1989 ने मतदानाचे वय 21 वरून 18 वर्षे केल्याने आयोगावरचा ताण वाढल्याने 16 ऑक्टोबर 1989 रोजी अन्य 2 निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यात आली.
- जानेवारी 1990 मध्ये आयोग पुन्हा एक सदस्यीय बनविण्यात आला.
- पुन्हा ऑक्टोबर 1993 मध्ये दोन इतर आयुक्तांची नेमणूक करून बहुसदस्यीय बनविण्यात आला.

**सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त : सुनील अरोरा**

इतर दोन आयुक्त : 1. अशोक लवासा,
2. सुशील चंद्र

## दिनविशेष

## 11 नोव्हेंबर : राष्ट्रीय शिक्षण दिवस

- राष्ट्रीय शिक्षण दिवस भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जन्मदिनादिवशी साजरा केला जातो.
- या दिवसाची सुरुवात 2008 पासून झाली.
- मौलाना आझाद यांनी खिलाफत चळवळीत भाग घेतला होता.
- त्यांनी धारासना सत्याग्रहातही भाग घेतला होता.
- 1923 च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. हे अध्यक्षपद वयाच्या 35 व्या वर्षी त्यांना मिळाले होते. ते सर्वात कमी वयाचे अध्यक्ष होते.

**भारतातील शिक्षणविषयक धोरणे**

- पढे भारत, बढे भारत योजना
- 26 ऑगस्ट 2014 ला ही योजना सुरू करण्यात आली.
- मुलांमध्ये लवकरात लवकर भाषेचा विकास करणे.
- लवकरात लवकर गणित विषय अवगत करणे.

- मुलांना प्रोत्साहित करणे, मुभा देणे, त्यांना वाचनात व लिहिण्यात गुंतविणे जेणेकरून त्यांच्यात वाचनाचे व लिहिण्याचे कौशल्य विकसित होईल.

**राष्ट्रीय आविष्कार अभियान**
- 9 जुलै 2014 ला सुरुवात डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते उदयास
- लक्ष्य गट : 6 ते 18 वर्षे वयोगट
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि गणितासाठी शाळांमध्ये वर्ग उभारणे, प्रयोगशाळा उभारणे, तंत्रज्ञान विकसित करणे, शिक्षक नेमणे हे लक्ष्य ठेवण्यात आले.

**विद्यापीठ अनुदान आयोग**
- नोव्हेंबर 1948 स्थापना
- अध्यक्ष : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**शिफारसी :**
- विद्यापीठ शिक्षणाचा समावेश समवर्ती सूचित करावा.
- विद्यापीठांना अनुदान प्रदान करण्यासाठी केंद्रीय अनुदान आयोग स्थापन करावा.

**1944 च्या सार्जंट अहवालानुसार**
- 1943 मध्ये विद्यापीठी अनुदान समितीची स्थापना केली. 1954 मध्ये या समितीचे रूपांतर विद्यापीठ शिक्षण आयोगात केले.

**मुदलियार माध्यमिक शिक्षण आयोग**
- स्थापना : सप्टेंबर 1952
- माध्यमिक शिक्षण 7 वर्षांचे असावे.
- तांत्रिक विद्यालये उभारावीत.

**स्त्रीशिक्षणासाठीची राष्ट्रीय समिती**
- अध्यक्षा : दुर्गाबाई देशमुख
- मुलींच्या व महिलांच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय शिक्षण परिषद स्थापन करण्यात आली

**कोठारी आयोग (शिक्षण आयोग) 1964-66**
- अध्यक्ष : डी. एस. कोठारी
- 10+2+3 हे शिक्षणाची संरचना असावी.
- देशात शैक्षणिक संरचना समान असावी.

## 14 नोव्हेंबर : जागतिक मधुमेह दिवस

- 1991 पासून दरवर्षी 14 नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह दिवस म्हणून साजरा केला जातो.
- मधुमेह या आजाराविषयी जनमानसांमध्ये जागरूकता पसरावी यासाठी हा दिवस पाळला जातो.
- सर फ्रेडरिक बेंटिक यांनी 1922 मध्ये इन्शुलिन या संप्रेरकाचा शोध लावला जो मधुमेहाच्या उपचारासाठी अतिमहत्त्वाचा उपचार आहे.
- त्यांचा जन्मदिवस 14 नोव्हेंबर असल्याने हा दिवस जागतिक मधुमेह दिवस म्हणून साजरा केला जातो.
- यावर्षीची संकल्पना: Family and Diabetes

**मधुमेह :**
- या आजारामध्ये रक्तातील शर्करेचे (ग्लुकोज) प्रमाण साधारण प्रमाणापेक्षा वाढते. यास Hyperglycenia असे म्हणतात.
- इन्शुलिन हे रक्तातील ग्लुकोजचे नियंत्रण करणारे संप्रेरक आहे जे स्वादुपिंडाद्वारे स्रवले जाते.
- मधुमेहामध्ये इन्शुलिन एकतर निर्माण होत नाही किंवा त्याचे खूप कमी उत्पादन शरीरात होते त्यामुळे रक्तात साखरेचे प्रमाण वाढते.
- याने भूक लागणे, थकवा, दृष्टी कमी होणे असे लक्षणे दिसायला लागतात.
- त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णास इन्शुलिन कृत्रिमरीत्या पुरवावे लागते.
- आज जगात सर्वात जास्त मधुमेहाचे रूग्ण भारतात आढळतात.

## 14 नोव्हेंबर : राष्ट्रीय बाल दिन

- 14 नोव्हेंबर हा पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंचा जन्मदिवस राष्ट्रीय बालदिवस म्हणून साजरा केला जातो.
- 1964 पूर्वी 20 नोव्हेंबरला बालदिवस साजरा केला जात असे. हा दिवस संयुक्त राष्ट्रांद्वारे निश्चित केला होता.
- 1964 पासून नेहरूंच्या मृत्यूनंतर हा दिवस 14 नोव्हेंबर या दिवशी साजरा केला जातो.

**मुलांसाठी घटनात्मक तरतुदी व योजना :**
- कलम 15 (3) नुसार राज्यसंस्था महिला व बालकांसाठी कोणतीही विशेष तरतूद करू शकते.
- कलम 21 (A) नुसार राज्यसंस्था 6 ते 14 वर्षांपर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरविल्यानुसार मोफत व अनिवार्य शिक्षण उपलब्ध करून देईल. 96 व्या घटनादुरुस्तीने, 2002 ही तरतूद करण्यात आली या कलमाने प्राथमिक

शिक्षण हा मूलभूत हक्क करण्यात आला.

- कलम 23 नुसार महिला, पुरुष व बालकांच्या अपव्यापारास व वेठबिगारीस मनाई केली आहे.
- कलम 24 नुसार बालकांना धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. (ही तरतूद 14 वर्षांपर्यंतच्या बालकांसाठी आहे.)
- कलम 45 नुसार राज्य सहा वर्षांखालील बालकांचे संगोपन व त्यांच्यासाठी शिक्षणाची तरतूद करेल.
- कलम 51 (A) (K) नुसार जन्मदाता किंवा पालक आपल्या अपत्याला किंवा पाल्यास त्याच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देईल. (86 व्या घटनादुरुस्तीने 2002) ही तरतूद करण्यात आली.

**बालकांसाठीच्या योजना**

**राष्ट्रीय बालक धोरण 1974**

- वरील घटनेतील कलमांना अनुसरून 22 ऑगस्ट 1974 रोजी हे धोरण जाहीर करण्यात आले.
- या धोरणानुसार 1975 मध्ये एकात्मिक बालविकास योजना सुरू करण्यात आली.

**एकात्मिक बालविकास योजना**

- स्थापना : 20 ऑक्टोबर 1975
- लाभार्थी : 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालक, गरोदर व स्तनदा माता.
- ही योजना शालेयपूर्व अनौपचारिक शिक्षण पुरवते व कुपोषण व बालमर्त्यता कमी करण्याचे काम करते.

**लक्ष्ये :**

- मृत्युदर, आजाराचे प्रमाण, कुपोषण कमी करणे, बालकांच्या आरोग्य व पोषणासाठी आवश्यक पोषण व आरोग्य शिक्षण देऊन मातांना सक्षम बनविणे.

**राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग**

- बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम 2006 नुसार 5 मार्च 2007 रोजी या आयोगाची स्थापना करण्यात आली.

**कार्ये :**

- बालकांच्या हक्कांबाबत धोरणे व कार्यक्रमांचा अहवाल तयार करणे.
- बालहक्क क्षेत्रात अभ्यास व संशोधनास चालना देणे.
- बालहक्कांबाबत साक्षरता वाढविणे
- संकटात सापडलेल्या मुलांना तसेच विशेष गरजा व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना प्रश्नांची सोडवणूक करण्याचे उपाय योजणे.

# अयोध्येचा ऐतिहासिक निकाल

अयोध्येतील 'रामजन्मभूमी' म्हणून ओळखली जाणारी बाबरी मशिदीची जागा १८८५ पासून कायदेशीर वादाचा विषय आहे. हा संदर्भ शनिवारच्या निकालाने जुना ठरला असला, तरी ते इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. तब्बल ४० दिवस सर्व पक्षकारांचे यक्तिवाद ऐकून घेऊन न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. याबाबत सुनावणी करतानाच सर्वोच्च न्यायालयाने सुरुवातीलाच काही गोष्टी स्पष्ट केल्या. सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, संविधानानुसार न्यायसंस्थेची स्थापना झालेली आहे. त्यामुळे विश्वास व श्रद्धा यांच्यामध्ये न अडकता आम्ही संविधानातील धर्मनिरपेक्षता महत्त्वाची मानतो. ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. किंबहुना, या परिप्रेक्ष्यातून निकालाकडे पाहिले पाहिजे. या खटल्यामध्ये खूप घडामोडी घडल्या आहेत. कायद्याने राम मंदिर बांधता येईल की नाही हे आम्ही सांगू शकत नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. त्यानुसार, सरकारने कोणत्याही धर्माशी जवळीक दाखवू नये असा सल्लाही दिला होता. १९५० सालापासूनचा हा वाद अनेक प्रक्रियांमधून प्रवास करत नागमोडी, तीव्र उतार-चढावाची वळणे घेत अखेर संपुष्टात आला आहे.

रामजन्मभूमी-बाबरी मशीद खटल्यात वादग्रस्त ठरलेल्या संपूर्ण २.७७ एकर भूमीवर भगवान रामाचे मंदिर बांधले जाईल, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने शनिवारी ५-० अशा सर्वसंमतीने दिला. वादग्रस्त भूमीचा ताबा पूर्णपणे रामलल्ला विराजमानला बहाल करताना सरकारने मशिदीच्या बांधकामासाठी सुन्नी वक्फ बोर्डाला अयोध्येतच महत्त्वाच्या जागी पाच एकर जमीन द्यावी, असा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यातील तिसरा पक्ष निर्मोही आखाड्याचा दावा फेटाळला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अयोध्येतील वादग्रस्त जमिनीवरील मुख्य गुंबजाच्या खालीच रामलल्लाचे जन्मस्थान असल्याचा तर्कही न्यायालयाने मान्य केला आहे. २.७७ एकर जमिनीत रामलल्ला विराजमान आणि सुन्नी वक्फ बोर्डासोबत निर्मोही आखाड्याला बरोबरीचा वाटा देण्याचा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल तर्कसंगत नव्हता, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालात नमूद केले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने सप्टेंबर २०१० मध्ये वादग्रस्त जमिनीचे तीन समान भाग करून तीन पक्षकारांना वाटण्याचा निकाल चुकीचा होता. हा खटला जमिनीच्या मालकीहक्काचा नव्हताच, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तूर्तास, या जमिनीचा मालकी हक्क केंद्र सरकारला देण्यात आला असून त्यानंतर ही जमीन न्यासाच्या स्वाधीन केली जाईल. केंद्र सरकारने तीन महिन्यांच्या आत मंदिराच्या बांधकामासाठी न्यास स्थापन करावा आणि न्यासाच्या व्यवस्थापनाने नियम तयार करावे. मंदिराचे बांधकाम केंद्र सरकारच्या देखरेखीखाली होईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

**मशिदीची निर्मिती रिक्त जागेवर नव्हती**

शनिवारच्या १०४५ पानी निकालपत्रात पाचही न्यायाधीशांनी ९२९ पानांपर्यंत सहमती व्यक्त केली आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अहवालाचा आधार ठरवून हा निकाल देताना भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे काम संशयातीत असून त्यांच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे न्या. गोगोई यांनी नमूद केले. पण निकालाचा आधार केवळ भारतीय पुरातत्त्व विभागाचे निष्कर्ष होऊ शकत नाही. मंदिर उद्ध्वस्त करून मशिदीचे बांधकाम करण्यात आले हे भारतीय पुरातत्त्व विभागाला सिद्ध करता आलेले नाही. पण, बाबरी मशिदीची निर्मिती रिक्त जागेवर झालेली नव्हती. जमिनीखाली सापडलेल्या कलाकृती आणि बांधकाम इस्लामी नव्हते. भारतीय पुरातत्त्व विभागाच्या निष्कर्षांनुसार उद्ध्वस्त केलेले बांधकाम १२ व्या शतकातील मंदिराचे होते, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भारतात इंग्रज दाखल होण्याच्या आधी हिंदू भाविक राम चबुतरा आणि सीता रसोईची पूजा करीत होते. राम चबुतरा, सीता रसोई आणि भांडारगृहाचे अस्तित्व या ठिकाणची धार्मिक वस्तुस्थिती स्पष्ट करते. वादग्रस्त जमिनीच्या बाहेरच्या भागावर हिंदूंचा ताबा होता, हे दस्तावेजांवरून स्पष्ट होते. ही जमीन मशिदीचा आतला भाग हा भगवान रामाच्या जन्मभूमीचा असल्याची हिंदूंची नेहमीच धारणा राहिली

आहे. या बांधकामाच्या आत मुस्लीम इबादत करीत होते आणि हिंदू त्याच्या बाहेर पूजा करीत होते, हे सिद्ध झाले आहे. मुस्लिमांनी मशिदीचा त्याग केला, याचेही पुरावे नाहीत. १८५७च्या आधी केवळ मुस्लिमांचाच या स्थळावर ताबा होता याचे पुरावे त्यांना सादर करता आले नाहीत. भगवान रामाचा जन्म अयोध्येत झाला ही हिंदूंची निर्विवाद आस्था आणि विश्वास आहे. भगवान रामाचा जन्म गुंबजाच्या खाली झाला होता, अशी हिंदूंची आस्था आणि आस्था हा वैयक्तिक विश्वासाचा विषय आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात म्हटले आहे.

राममंदिर चळवळीला आकार देणाऱ्यांमध्ये परमहंस रामचंद्र दास, अशोक सिंघल व लालकृष्ण अडवाणी ही त्रिमूर्ती आघाडीवर होती. राम मंदिरासाठी लालकृष्ण अडवाणी यांनी सन १९९० मध्ये रथयात्रा काढली होती. त्या रथयात्रेची संकल्पना, त्याची आखणी या सगळ्यात गोविंदाचार्य यांचा वाटा महत्त्वाचा होता.

**लढा आयुष्यभराचा**

**गोपालसिंह विशारद**

- १९५० मध्ये कोर्टात पहिल्यांदा धाव.
- अस्थान जन्मभूमीमध्ये पूजा करण्याची परवानगी मागितली.
- १९८६ मध्ये निधन.

**मोहम्मद हाशिम अन्सारी**

- दाव्यातील सर्वात वयोवृद्ध याचिकाकर्ते.
- १९६१ मध्ये केली याचिका दाखल.
- २०१६ मध्ये निधन.

**एम. सिद्दीक़**

- मूळ याचिकाकर्ते
- 'जमातुल उलेमा ए हिंद'चे सरचिटणीस.
- सुनावणी दरम्यान निधन.

**महंत परमहंस रामचंद्रदास**

- दिगंबर आखाड्याचे प्रमुख.
- फैज़ाबाद कोर्टात याचिका दाखल केली होती.
- रामजन्मभूमी न्यासाचे प्रमुख.
- २००३ मध्ये निधन.

**घटनाक्रम**

**१५२८ :** मुघल बादशाह बाबरचा सेनापती मीर बांकी याने बाबरी मशिदीची उभारणी केली.

**१८१३ :** अयोध्येतील रामजन्मभूमीवर राम मंदिर होते आणि मंदिर पाडून बाबराच्या सेनापतीने त्याजागी मशीद उभारल्याचा दावा हिंदू संघटनांनी केला. या जमिनीवरील हा हिंदू संघटनांचा पहिला दावा होता.

**१८५३ :** हिंदूंनी जागेचा ताबा मागितल्याने जातीय हिंसाचार सुरू झाला. पण वसाहतवादी राज्यकर्त्यांनी हिंदूना ताबा नाकारला.

**१८५९ :** ब्रिटिश शासकांनी वादग्रस्त जागेला कुंपण घातलं आणि मुस्लिमांना मशिदीच्या आतील तर हिंदूंना मशिदीच्या बाहेरची जागा देऊन तेथील चौथऱ्यावर पूजा करण्याची परवानगी दिली.

**१९४६ :** अखिल भारतीय रामायण महासभा या हिंदू महासभेच्या संघटनेने वादग्रस्त जागेच्या ताब्यासाठी आंदोलन सुरू केले.

**१९४९ :** २३ डिसेंबर १९४९ रोजी वादग्रस्त जागेवर प्रभू श्रीराम आणि लक्ष्मणाच्या मूर्ती आढळून आल्याने या वादाने नवे वळण घेतले. अयोध्येत राम प्रकट झाले, असा दावा हिंदूंनी केला तर मुस्लिमांनी त्यास आक्षेप घेत रात्रीच्या अंधारात कुणीतरी या मूर्ती आणून तिथे ठेवल्याचा दावा केला. त्यामुळे वाद अधिक वाढू नये म्हणून तत्कालीन सरकारने 'वादग्रस्त वास्तू' असा शिक्का लावत मशिदीला टाळे लावले.

**१९५० :** फैज़ाबाद न्यायालयात हिंदूंनी दोन दावे दाखल केले, त्यात रामलल्ला मूर्तीच्या ठिकाणी जाऊन पूजापाठ करण्याची परवानगी मागितली.

**१९५९ :** निर्मोही आखाड्यानेही हिंदूंच्या वतीने दावा दाखल केला.

**१९६१ :** उत्तर प्रदेशच्या सुन्नी केंद्रीय वक्फ मंडळाने मूर्ती काढून जागेचा ताबा देण्यासाठी न्यायालयात धाव घेतली.

**१९८६ :** १ फेब्रुवारी १९८६ रोजी फैजाबाद न्यायालयाने वादग्रस्त ठिकाणी लावण्यात आलेले टाळे उघडून हिंदूंना पूजा करण्याचा अधिकार बहाल करणारा आदेश दिला. या निर्णयाला विरोध करत बाबरी मशीद संघर्ष समिती स्थापन करण्यात आली.

**१९९२ :** उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री कल्याण सिंह यांनी वादग्रस्त जागेच्या संरक्षणाबाबत प्रतिज्ञापत्र दिलं असताना ६ डिसेंबर रोजी देशभरातून अयोध्येत दाखल झालेल्या हजारो करसेवकांनी बाबरी मशीद पाडली. तिथे घाईघाईत छोटंसं मंदिरही उभारण्यात आलं.

त्यानंतर हिंदू-मुस्लीम दंगली झाल्या. सरकारने नंतर लिबरहान चौकशी आयोग नेमला. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एम.एस. लिबरहान यांच्यावर वादग्रस्त बाबरी मशीद पाडल्याच्या घटनेची चौकशी करण्याचे काम सोपवण्यात आले.

१९९३ : अयोध्येतील काही जमीन अधिग्रहण करण्याबाबत कायदा ३ एप्रिल रोजी मंजूर करण्यात आला.

१९९४ : इस्माइल फारुखी प्रकरणात २४ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आणि त्यात मशीद हा इस्लामचा एकात्म भाग नसल्याचे स्पष्ट केले. अलाहाबाद हायकोर्टाच्या लखनऊ पीठापुढे बाबरीमशीद पतनाबाबतच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली.

**२००२ :** तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी १ जानेवारी २००२ रोजी अयोध्या विभाग स्थापन केला. हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही पक्षकारांशी संवाद साधण्याची व वाद मिटवण्याचा प्रयत्न करण्याची जबाबदारी या विभागावर सोपवण्यात आली. १ एप्रिल २००२ रोजी अयोध्येतील वादग्रस्त जागेच्या मालकीसाठी दाखल दाव्यांवर अलाहाबाद हायकोर्टाच्या तीन सदस्यीय पीठाने सुनावणी सुरू केली. हिंदू कार्यकर्त्यांना घेऊन येणाऱ्या साबरमती एक्स्प्रेसला २७ फेब्रुवारी रोजी गुजरातमधील गोध्रा येथे आग लावण्यात आली. त्यात ५८ जण मारले गेले. हे सर्वजण अयोध्येतून परतत होते. या घटनेनंतर उसळलेल्या गुजरात दंगलीत २००० हून अधिक लोकांचा बळी गेला.

**२००३ :** भारतीय पुरात्त्व विभागाने २२ ऑगस्ट २००३ रोजी अयोध्येतील उत्खनानाबाबतचा अहवाल अलाहाबाद हायकोर्टात सादर केला. मशिदीच्या बांधकामाखाली दहाव्या शतकातील मंदिराचे अवशेष आढळले, असे या अहवालात नमूद करण्यात आले होते. मुस्लिम पक्षकारांकडून यावर वेगवेगळी मते नोंदवण्यात आली. या अहवालाला ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने आव्हान दिले.

**२००९ :** लिबरहान आयोगाने तब्बल १७ वर्षांनंतर तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे आपला अहवाल सादर केला.

**२०१० :** अलाहाबाद उच्च न्यायालयाने २ विरुद्ध १ मतांनी ३० सप्टेंबर रोजी असा निकाल दिला की, वादग्रस्त जागेचे तीन समान भाग करून सुन्नी वक्फ मंडळ, निर्मोही आखाडा व रामलल्ला यांना वाटून द्यावेत.

**२०१६ :** भाजप सरकार केंद्रात आल्यानंतर माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात राम मंदिर उभारणीसाठी याचिका दाखल केली.

**२०१७ :** २१ मार्च रोजी तत्कालीन सरन्यायाधीश जे.एस.खेहर यांनी संबंधित पक्षांना न्यायालयाबाहेर तोडगा काढण्यास सांगितले. त्यानंतर १९ एप्रिल रोजी सुप्रीम कोर्टाने लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, उमा भारती यांच्यासह भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक नेत्यांवर फौजदारी खटला चालवण्याचे आदेश दिले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावरील अपिलांच्या सुनावणीसाठी ७ ऑगस्टला न्यायालयाने तीन न्यायाधीशांच्या पीठाची स्थापना केली. ९ नोव्हेंबर रोजी उत्तर प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतल्यानंतर शिया वक्फ बोर्डाचे अध्यक्ष वसीम रिझवी यांनी अयोध्येतील वादग्रस्त जागेवर राम मंदिर व्हावं व तिथून दूर अन्य ठिकाणी मशीद उभारली जावी, असे विधान केले. १६ नोव्हेंबर रोजी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे श्री. रविशंकर यांनी वाद मिटवण्यासाठी मध्यस्थी केली. विविध पक्षकारांची भेट घेऊन त्यांनी संवाद साधला. ५ डिसेंबर रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली असता, कोर्टाने ८ फेब्रुवारीपर्यंत सर्व दस्तावेजांची पूर्तता करण्याचे निर्देश दिले.

**२०१९ :** सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण मध्यस्थीसाठी सुपूर्द केले. आठ आठवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले. पण मध्यस्थीतून तोडगा काढण्यासाठी नेमलेल्या पथकास अपयश आले.

**६ ऑगस्ट २०१९ :** सर्वोच्च न्यायालयाने रोजच्या रोज सुनावणी सुरू केली. ४० दिवस सुनावणी चालली.

**१६ ऑक्टोबर २०१९ :** सर्वोच्च न्यायालयाने अयोध्या प्रकरणी निकाल राखून ठेवला.

**९ नोव्हेंबर २०१९ :** रामलल्ला विराजमानच्या बाजूने निकाल, वादग्रस्त २.७७ एकर जागेची मालकी ही रामलल्ला विराजमान यांना देण्यात आली. सुन्नी वक्फ मंडळाला मशीद उभारण्यासाठी पाच एकर पर्यायी जागा देण्याचा आदेश.

रामजन्मभूमी-बाबरी मशीद वादावर सर्वोच्च न्यायालयापुढे हिंदू भाविक गोपालसिंह विशारद

(१९५०), परमहंस रामचंद्र दास (१९५०), निर्मोही आखाडा (१९५९), सुन्नी वक्फ बोर्ड (१९६१) आणि रामलल्ला विराजमान (१९८९) अशा पाच याचिका विचाराधीन होत्या. त्यापैकी पहिल्या दोन याचिका रद्द झाल्या, तर निर्मोही आखाड्याची याचिका फेटाळण्यात आली. १९४६ च्या फैज़ाबाद न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणारी शिया वक्फ बोर्डाची विशेष अनुमती याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

सर्वोच्च न्यायालयाने एक वास्तव आणखी स्वीकारले आहे आणि कदाचित पुरात्त्व विभागाच्या अहवालातूनही ते स्पष्ट झाले असावे. त्यानुसार, प्राचीन काळी परदेशी यात्रेकरूंनी राममंदिराबाबत लिहिलेले आहे. यामुळे तेव्हापासून कदाचित राममंदिराचे अस्तित्व होते. ब्रिटिशकाळातही दोन्ही समाजाच्या हिंदूंची पूजा आणि मुसलमानांचे नमाज पठण होत होते. दोन्ही धर्मांना न्याय देण्यासाठी मध्ये एक लोखंडी रेलिंग लावून दोन्ही धर्मांना न्याय देण्याचा प्रयत्न केला होता. ह्या गोष्टी सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कायद्याच्या कसोटीवरच मालकी ठरवता येते हे सांगताना मुसलमान लोकांचा हा युक्तिवाद रद्दबातल ठरवला की आम्ही अनेक वर्षांपासून ही जागा वापरतो त्यामुळे ही जमीन आमचीच आहे. त्याआधारे आम्ही मालकी हक्क इथे निश्चित करणार नाही हे न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे. हिंदू पक्षकारांमार्फत सांगण्यात आले की आतल्या भागात पूजा होतेच पण बाहेरच्या भागातही आम्ही पूजा करतो. पण न्यायालयाने तेही अमान्य केले आहे. कारण याचे काहीही पुरावे नाहीत. १८५७ पूर्वी यावर मुसलमानांचा ताबा होता हे दर्शवणाराही काही पुरावा नाही. या सर्वांच्या आधारे जो युक्तिवाद झाला त्यातून सर्वोच्च न्यायालयाने न्यायिक व्यवस्थापन करताना भावना, श्रद्धा या मुद्द्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. तसेच यासाठी तीन महिन्यांची परवानगी देण्यात आली आहे. वेळेचे बंधन असल्यामुळे ही प्रक्रिया गतिमानतेने पार पडेल अशी अपेक्षा आहे आणखी एक मुद्दा म्हणजे, मंदिर उभारणीसाठी केंद्र सरकारला एक ट्रस्ट स्थापन करण्याचे निर्देश दिले गेले आहेत, ही बाबही महत्त्वाची आहे. कारण ज्या भावनिकतेने हिंदू-मुस्लिम एकत्र येतात, मंदीर, मशीद बांधतात, त्याच इमानदारीने, सात्विकतेने हिशोब ठेवले जात नाहीत. ही अपारदर्शकता हाणून पाडण्याचा प्रयत्न न्यायालयाने केला आहे. ट्रस्ट तयार केल्यामुळे याला कायदेशीर अस्तित्व येऊन यातून पारदर्शकता वाढेल. याखेरीज ही सर्व वादग्रस्त जमीन सरकारने ताब्यात घ्यावी असे न्यायालयाने सांगितले आहे. वास्तविक, १९९३ मध्ये ही संपूर्ण जमीन सरकारने अधिग्रहित केलेली होती. त्यामुळे न्यायालयाला हा निकाल देणे सोपे झाले आणि त्या जमिनीचे व्यवस्थापन कसे करावे हे न्यायालयाने सांगितले आहे.

अशीच एक ऐतिहासिक घटना सत्तर वर्षांपूर्वी झाली होती. सोमनाथ मंदिर गझनीने मुघलांच्या आगमनाच्या अनेक शतके आधी पाडून टाकले होते. ते मंदिर १९५० मध्ये पुन्हा बांधण्यात आले. त्या वेळचे राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी असे म्हटले होते की, 'ज्या ठिकाणावर लोकांची अपार श्रद्धा आहे ते (ठिकाण) कुठलीही व्यक्ती किंवा सत्ता संपवून टाकू शकत नाही. हाच संदेश या मंदिराच्या उभारणीतून जगाला देण्यात आला आहे. राखेतून उठून घेतलेली ही भरारी आहे.'

अयोध्येतील राम मंदिराचा लढा हा अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या योग्य व तर्कशुद्ध निर्णयाने संपला. आता राम मंदिराच्या निर्माणानंतर देशात शाश्वत शांतता व सलोख्याचे वातावरण निर्माण होईल अशी आशा आहे. मुळात भारत हे बहुसांस्कृतिक व धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. विविधतेत एकता हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. राम आणि रहीम एकत्र नांदणे, हीच खरी भारतीय संस्कृती होय. ती अधिकाधिक समृद्ध करून हा देश आपल्याला प्रगतीपथावर न्यायचा आहे. श्रद्धा हा भावनेचा विषय असून, ती प्रत्येकाची व्यक्तिगत बाब आहे. त्याचा अनादर होऊ नये. मात्र, बाजारही मांडला जाता कामा नये. आजच्या विज्ञानयुगात विकसित राष्ट्र म्हणून झेप घ्यायची असेल, तर धर्मजातीच्या पलिकडे जाऊन माणूस म्हणून आपण एकवटले पाहिजे. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांनी वनवास भोगला. सर्वसामान्यांसारखे जीवन जगताना कर्तव्य व प्रजेचे हित महत्त्वाचे मानले. आजच्या राजकारण्यांनीही प्रभुरामाचा आदर्श घ्यावा. रामाच्या नावावर राजकारण वा सामाजिक धूलीकरण टाळावे. त्याऐवजी रामराज्याची, सुराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी झटावे. हार-जीत ही मनाची विचारधारा आहे. मनाने हरतो, तोच हरतो व मनाने जिंकतो, तो जिंकतो. म्हणून मन मोठे हवे. मनाच्या विश्वासाने वा

| | |
|---|---|
| शुद्धतेनेच ईश्वरापर्यंत पोहोचता येते, असे संत कबीर म्हणतात. ही मनाची शुद्धता व विश्वासच भारताला पुढे नेईल. | |

चाणक्य मंडल परिवार